# महिलांसंबधीचे कायदे व अटी नियम



काळाच्या ओघात कुटुंब संस्थेचा विकास होत असताना महिलांचे कार्यक्षेत्र संकुचित होत गेले. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या स्विकारताना समाजातले मूल्यही हरवत गेले. अनेक रूढी, परंपरेच्या नावाखाली स्त्री हा घटक बळी ठरत गेल्या. आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या समाजातही पुरुष प्रधान मानसिकता स्त्रियांना एक माणूस, समाजाचा घटक म्हणून स्विकारताना आढळून येत नाही. स्त्रीभ्रूण हत्येपासून ते पैशांसाठी, चारित्र्यावरून तिचा जीव घेण्यापर्यंत समाजात घटना घडत आहेत. म्हणून महिला संबंधीचे अनेक कायदे, अटी नियम बनवावे लागले. स्वातंत्र्यापूर्वी सतीबंदीचा कायदा बनवला गेला. नंतर काळानुरूप महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे अटी, नियम बनवले गेले आहे. त्याची भारताचा एक नागरिक म्हणून प्रत्येक स्त्री व पुरूषाला माहिती असणे गरजेचे आहेत.

## स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांसंबंधी काही सर्वसाधारण

**समज–(समज = स्पष्टीकरण)**

१) बलात्कार करणाऱ्या व्यक्ती अनोळखी असतात.

**स्पष्टीकरण** – बलात्कार झालेल्या अनेक स्त्रियांना त्यांच्यावर बलात्कार करणाऱ्यांची शेजारी, नातेवाईक किंवा मित्र परिवारातील व्यक्ती म्हणून ओळख असते.

२) बलात्कार रात्री उशिरा घडतात.

**स्पष्टीकरण** – बहुतांश बलात्कार घरात होतात. त्यामुळे ते दिवसाच्या कोणत्याही वेळेस घडू शकतात.

३) बलात्कार बहुधा मानसिक संतुलन बिघडलेल्या पुरुषांपासून घडतात.

**स्पष्टीकरण** – हाही समज चुकीचा आहे. स्थिर बुद्धीचे पुरुष ही सावधपणे, योजनापूर्वक स्त्रीला जाळ्यात फासून बलात्कार करतात.

४) स्त्रिया उत्तान कपडे घालून पुरुषांचे चित्त विचलित करतात आणि बलात्काराला आमंत्रण देतात.

**स्पष्टीकरण –** एका सर्वेक्षणात नागरी हक्कांच्या गटास आढळले की बलात्कार सहसा ग्रामीण स्त्रियांवर, आदिवासी व दलित स्त्रियांवर होतात. त्यांची वेशभूषा कधीच उत्तान नसते.



५) ज्या स्त्रिया रात्री घराच्या बाहेर पडतात त्यांच्यावर बलात्कार होतो.

**स्पष्टीकरण –** परिचारिका, टेलिफोन ऑपरेटर्स, सचिव, बांधकाम मजूर यांना रात्रपाळी असते. मग त्या काय बलात्कार व्हावा म्हणून घराबाहेर पडतात काय?

६) मुलांचा कधीच लैंगिक छळ होत नाही.

**स्पष्टीकरण –** मुलेच जास्त हतबल असतात. कुटुंबियांकडून, नातेवाईकांकडून त्यांचा लैंगिक छळ होतो.

७) मुले लैंगिक छळाची कल्पना करतात.

**स्पष्टीकरण –** मुले लैंगिकतेबद्दल अनाभिज्ञ असतात. त्यामुळे ते लैंगिक छळाची कल्पना कशी करू शकणार?

८) पती-पत्नीच्या भांडणात मारहाण करायलाच पाहिजे.

**स्पष्टीकरण –** भांडण मारहाणीनेच व्हायला पाहिजे असे मुळीच नाही. अनेकदा त्या स्त्रियांना इतके मारले जाते की त्यांच्या शरीरा-वर माराच्या खुणा कायम राहतात.

९) पत्नीने काही केल्याशिवाय पती तिला मारत नाही.

**स्पष्टीकरण –** पत्नीने पतीला चिडविले हे कारण समर्पक ठरत नाही. जेवण, चहा करणे, कपडे, संशय, पैसे न देणे, मुलांचे रडणे यापैकी किती

तरी कारणे मारहाणीसंबंधी वर्तमानपत्रांत येतात.

१०) स्त्रियांना मार खाण्यात गंमत वाटते.

**स्पष्टीकरण –** कोणत्याही स्त्रीला सतत माराच्या दडपणाखाली राहणे किंवा मार सहन करणे शक्यच नसते. त्या आपल्या पतीवर अवलंबून असल्यामुळे त्या घराबाहेर पडू शकत नाहीत. त्या मुलांना पतीजवळ सोडू शकत नाहीत, इच्छित नाहीत. कदाचित त्यांना माहेरी घर किंवा इतर आधार मिळत नाही.



११) दारूच्या व्यसनामुळे मारहाण होते.

**स्पष्टीकरण –** हे एक कारण आहे. ते दारू पिऊन इतर पुरुषांना का मारत नाहीत? आणि दारू प्यालेले नसले तरी अनेक पुरुष स्त्रियांना मारहाण करतात.

१२) मध्यमवर्गीय स्त्रियांना मारहाण होत नाही.

**स्पष्टीकरण –** सर्व थरातील स्त्रियांना मारहाण होते. पण असा समज आहे की, गरीब आणि कामगार स्त्रियांनाच मारहाण होते. मध्यमवर्गातील स्त्रिया आपल्या प्रतिष्ठेला जपण्यासाठी आपल्यावरील झालेल्या अत्याचारांची वाच्यता करीत नाहीत.

## भारतीय राज्यघटना

भारतीय राज्यघटना भारतीय नागरिकांमध्ये कोणताही स्त्री–पुरुष असा भेद करत नाही. कायद्यासमोर समानता हे भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्य आहे. भारतीय राज्यघटनेतील काही कलम पुढीलप्रमाणे :–

### महिलांसंबधीचे कायदे व अटी नियम

भारतीय राज्यघटनेत सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा राखण्यासाठी शाश्वती दिली आहे. तसेच राज्यघटनेतील काही कलम स्त्री–पुरुष समानता संदर्भात आहेत. उद्देश पत्रिकेमध्ये दिलेला आहे.

**१) अधिनियम क्र.१४:-** समतेचा अधिकार-कायद्यामुळे प्रत्येक व्यक्तीला समान गृहीत धरून कायद्याने समान संरक्षण देण्यात आले आहे.


**२) अधिनियम क्र.१५ अन्वये:-** स्त्री व पुरुष या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

**३) अधिनियम क्र १६ अन्वये:-** सर्वांना समान संधी प्राप्त असून स्त्री-पुरुष या आधारावर कोणालाही एखाद्या नेमणुकीपासून वंचित ठेवता येणार नाही. स्त्री आणि पुरुषाला कामासाठी समान वेतन दिले जावे.

**४) अधिनियम ३९(ड) अन्वये:-** मजुरी करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होईल असे काम करण्यास भाग पाडू नये, स्त्री आणि पुरुषाला कामासाठी समान वेतन दिले जावे.

**५) अधिनियम क्र.४२ अन्वये:-** स्त्रीला प्रसुतीच्या वेळी योग्य ते फायदे मिळतील अशी व्यवस्था शासनाने करावी असे तत्त्व आहे.

**६) अधिनियम क्र. ५२ (अ) अन्वये :-** स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक अशा प्रथा मोडणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य समजले गेले आहे.



# भारतीय दंड विधान

भारतीय दंड विधान हे भारतीय नागरिकाने केलेल्या गुन्हेगारी कृत्याची व्याख्या आणि त्याची शिक्षा सांगणारा कायदा आहे. महिलांच्या गुन्ह्यासंदर्भातील खालील काही महत्त्वाचे कलम आहेत . ते खालील प्रमाणे

## शरीराचा खाजगीरित्या बचाव करण्याचा हक्क कलम ९६ ते १००

प्रत्येक खाजगीरित्या स्वत:च्या शरीराचा व मालमत्तेचा तसेच इतरांच्या शरीराचा व मालमत्तेचा बचाव करण्याचा हक्क दिलेला आहे. कलम १०० प्रमाणे बलात्कार, अनैसर्गिक लैंगिक वासनापूर्ती किंवा अपहरण करण्याच्या इराद्याने केलेल्या हल्ल्याखोराचा मृत्यू घडून आणेपर्यंत हक्क खालील मूलभूत तत्त्वावर अधारित आहे.

- ज्या कृत्याविरूद्ध हक्क वापरण्यात आले आहे. ते कृत्य कायद्याप्रमाणे अपराध आहे.
- बचाव करण्यासाठी वापरलेले बळ हे योग्य प्रमाणात असावे.
- पळून जात असलेल्या हल्लेखोरावर हक्क बजावता येत नाहीत.
- बचाव करणाऱ्या इसमास तो लोक प्रतिबंध करण्याकडे जाणे शक्य होणार नाही अशी परिस्थिती असणे.
- कलम १०६ प्रमाण सदर कृत्य बजावत असतांना कित्येक वेळेस निर्दोष व्यक्तींना अपाय होण्याचा व तसा धोका पत्करल्याशिवाय तो हक्क परिणामकारक वापरता येत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सदर हक्क बजावता येतो.

**कलम २२८ (क), ३७६(अ),(ख),(ग) भा.दं.वि. बळी पडलेल्या व्यक्तीचे नाव किंवा मजकूर मुद्रित किंवा प्रकाशित करण्यास बंदी घातली आहे.**

लैंगिक अत्याचार झालेल्या महिलांना समाजात स्वत:चे नाव बदनाम होण्याची जास्त भिती वाटत असते. त्यामुळे भारतीय दंड संहितेतील २२८ कलम हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## गर्भपातासंबंधी कलम कलम ३१२ ते ३१८ भा.दं.वि.


- **कलम ३१२ :-** जीव वाचवण्यासाठी गर्भपात करणे गर्भस्त्राव नसेल तर!
- **कलम ३१३ :-** स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात घडवून आणणे गुन्हा आहे.
- **कलम ३१४ :-** गर्भपात घडवून आणण्याच्या उद्देशामुळे स्त्रीचा मृत्यू घडवून आणणे हा अपराध आहे.
- **कलम ३१५:-** मूल जिवंत जन्मण्यास प्रतिबंध केल्यास किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणणाऱ्याकरिता केलेली कृती.



- **कलम ३१६:-** सदोष मनुष्य वधाबद्दल दोषी होऊ शकेल. अशा कृतीमुळे स्पंदन पावणाऱ्या अजाण गर्भ जिवाच्या मृत्यू घडवून आणणे अपराध आहे.
- **कलम ३१७:-** नवजात बालकास उघड्यावर टाकून त्याचा परित्याग करणे.
- **कलम ३१८:-** गुप्त रीतीने प्रेताची व्यवस्था करून मूल जन्मले ते गुप्त ठेवणे.

## विनयभंग

- **कलम ३५४:-** एखाद्या स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्या अंगावर जाणे किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग करणे.
- **कलम ३५४अ:-** लैंगिक छळ
- **कलम ३५४ब:-** विवस्त्र करण्याच्या उद्देशाने बलप्रयोग.
- **कलम ३५४क:-** चोरून अश्लिल चित्रण करणे.
- **कलम ३५४ड :-** चोरून पाठलाग करणे.



## अपहरणासंबंधी

- **कलम ३६३:-** पळवून नेण्याबाबत चा अपराध.
- **कलम ३६१ ते ३६२:-** कायदेशीर रखवालीतून चोरून नेणे किंवा पळवून नेणे.
- **कलम ३६६:-** सक्तीने विवाह करणे किंवा संभोग करणे इत्यादींची सक्ती करण्यासाठी पळवून नेणे किंवा अपहरण करणे.
- **कलम ३६६(अ):-** अज्ञान मुलगी अपहरणासाठी पळविणे हा अपराध आहे.
- **कलम ३६६(ब):-** परकीय देशांतून गैरकामांसाठी मुलींची आयात करणे.
- **कलम ३७२:-** वेश्या व्यवसाय इत्यादी कामासाठी अज्ञान मुलींची आयात करणे गुन्हा आहे.
- **कलम ३७३:-** वेश्या व्यवसायासाठी अज्ञान व्यक्तीची खरेदी करणे.

**कलम ३७६:- बलात्काराला शिक्षा होणे यास कलम ३७६ (अ ते ग) पर्यंत पोटकलमे आहेत.**

## अश्लिलसाहित्य प्रकाशनासंबंधी

- **कलम २९२:-** अश्लील पुस्तक, पत्रके, लिखाण, विक्री वितरण इत्यादी करणे गुन्हा आहे.
- **कलम २९३:-** अल्पवयीन इसमास अश्लील वस्तू १८ वर्षांखालील व्यक्तीला विकणे.
- **कलम २९४:-** सार्वजनिक ठिकाणी अश्लील कृती करणे हा गुन्हा आहे.

स्त्रियांना अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी कायद्यात बरीचशी कलमे आहेत. स्त्रियांना निर्भयपणे आपल्यावरील होणाऱ्या अन्यायविरुद्ध लढावे व त्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात कार्यरत असणाऱ्या **महिला सहायक** कक्षात खालील प्रकारच्या तक्रारी स्विकारल्या जातात.

## मुंबई पोलीस अधिनियम १९५१

- **कलम ६९** – पतीस पत्नीला चांगले वागविण्यासाठी आदेश देता येतो.
- **कलम ११०** – सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करणे. शिक्षा (कलम ११७)